# C1D/AGR102/EE/20160302

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2) प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप-प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उप-प्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

---

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) आंब्याच्या कोणत्याही चार उन्नत जातींची नावे लिहून एकाची गुणवैशिष्ट्ये लिहा. 5

ब) मिरची लागवडीविषयी खालील मुद्यांना अनुसरून माहिती लिहा. 5

i) दोन उन्नत वाणांची नावे

ii) लागवड पद्धती

iii) दोन महत्वाच्या किडी व त्यांचे नियंत्रण

क) आवळ्याचे मानवीदृष्ट्या महत्व स्पष्ट करा व आवळ्याच्या चार उन्नत वाणांची नावे लिहा. 5

ड) कोबीवर्गीय भाज्यांची नावे लिहून त्यांचे महत्व स्पष्ट करा. 5

इ) केळी लागवडीविषयी खालील मुद्यांना अनुसरून माहीती लिहा. 5

i) दोन उन्नत जातीची गुण वैशिष्ट्ये

ii) लागवड पद्धत

iii) रोगांच्या नियंत्रणासाठी उपाय योजना

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) नारळाला कल्पवृक्ष का म्हणतात ते स्पष्ट करा. 5

ब) उमराण व गोला ह्या बोराच्या जातींची गुणवैशिष्ट्ये लिहा. 5

क) वेलवर्गिय भाजीपिकावरील रोगांची चार नावे लिहून दोन रोगांचे नियंत्रण स्पष्ट करा. 5

ड) शेंगवर्गिय भाज्यांची काढणी, हाताळणी व प्रतवारी कशी करावी. 5

इ) पपईच्या लागवडीविषयी खालील मुद्यांना अनुसरून माहिती लिहा. 5

i) दोन उन्नत वाणांची नावे

ii) अभिवृद्धी व लागवड

iii) दोन महत्त्वाच्या किडी व त्यांचे नियंत्रण

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) कांदा या पिकाचे आहारातील महत्व स्पष्ट करा व विविध उन्नत वाणांची यादी करा. 5

ब) गुलाबाची काढणी करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवून काढणी करावी ते लिहा. 5

क) पालक या पालेभाजीची खालील मुद्द्यांवर माहिती लिहा. 5

i) दोन उन्नत जाती

ii) आहारातील महत्व

iii) लागवड पद्धत

ड) कार्नेशन या पिकावरील महत्त्वाच्या रोगांची नावे लिहून त्यांचे नियंत्रण स्पष्ट करा. 5

इ) शेवगा या पिकाविषयी खालील मुद्द्यांवर माहिती लिहा. 5

i) मानवी आहारदृष्ट्या महत्व

ii) दोन सुधारीत वाणांची गुणवैशिष्ट्ये

iii) लागवड पद्धती

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) गाजर व रताळ्यांची काढणी कशी करावी ते थोडक्यात स्पष्ट करा. 5

ब) निशिगंध या फुलझाडांची खालील मुद्द्यांच्या आधारे माहिती लिहा. 5

i) उन्नत वाणाची नावे

ii) अभिवृद्धी व लागवड पद्धत

iii) काढणी व हाताळणी

क) आले व हळदीची अभिवृद्धी व लागवड कशी करावी ते लिहा. 5

ड) शेवंतीची काढणी, हाताळणी व प्रतवारी कशी करावी ते थोडक्यात स्पष्ट करा. 5

इ) जास्मिन गटातील कोणत्याही चार फुलांची नावे लिहून त्या पिकांवर येणाऱ्या रोगांची नावे लिहा. 5

✦✦✦✦✦✦✦